राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

**कालमर्यादा – २७/०४/२०२२**

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२२/ 1865 दिनांक : 21 APR 2022

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय पदवी संस्था

विषय - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,रत्नागिरी येथील पदे भरण्याबाबत...

संदर्भ - मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/शाअम रत्नागिरी/बदली/२०२२/ २८२ दिनांक २१/०४/२०२२

उपरोक्त संदर्भिय मा.संचालक यांच्या पत्राचे अवलोकन करावे. तद्नुषंगाने सन २०२१-२२ पासून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,रत्नागिरी सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे. सबब या संस्थेतील शिक्षकीय पदे सन २०२२ च्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये भरावयाची आहेत.

त्यास अनुसरुन आपल्या संस्थेतील जे अध्यापक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,रत्नागिरी येथे बदलीने जाण्यासाठी तयार आहेत अशा अध्यापकांकडून बदलीकरिता वैयक्तिक पसंतीचे ठिकाण/विकल्प भरुन घेऊन दिनांक २७/०४/२०२२ पर्यंत व्दिप्रतीत या कार्यालयांस सादर करण्यात यावेत.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२- ६८५९७४७३,४०४.
ई-मेल–desk4@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: ४/आस्था/शाअम रत्नागिरी/बदली/२०२२/२८२ दिनांक : 21 APR 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

विषय : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी येथील पदे भरण्याबाबत.
संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टीईएम २०२०/प्र.क्र.१८४/ तांशि-४, दि. २५/४/२०२१.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. मान्यता २०२१/(प्र.क्र.६५/२१)/ तांशि-५, दि. ११/४/२०२२.

संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये रत्नागिरी येथे सन २०२१-२२ पासून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सदर अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. संदर्भाधिन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरीकरीता शिक्षकीय तसेच शिक्षकेतर पदे वर्षनिहाय टप्प्याटप्पयाने मंजूर करण्यात आलेली आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ करीता मंजूर करण्यात आलेली पदे सन २०२२ च्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये भरावयाची आहेत.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालयातील जे अध्यापक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय रत्नागिरी येथे बदलीने जाण्यासाठी तयार आहेत अशा अध्यापकांकडून बदलीकरीता वैयक्तिक पसंतीचे ठिकाण / विकल्प घेऊन ८ दिवसात संचालनालयास सादर करण्यात यावेत.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
21 APR 2022
3674

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण, म.रा. मुंबई

प्रत :
१) संचालक / प्राचार्य, शासकीय अभि.महाविद्यालय, पुणे/अवसरी/कराड/जळगाव/ औरंगाबाद/अमरावती/ यवतमाळ/चंद्रपूर/नागपूर.